391 G.Q.1108(Legal)

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, भाईंदर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/663/2011-12 दिनांक :- 31/5/2011

प्रति,
जमीन/जागामालक - श्री. नारायण सिताराम व इतर
अधिकार पत्रधारक - मे. संकल्प कन्स्ट्रक्शन
द्वारा - वास्तुविशारद - मे. आर.जे. आशर

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - घोडबंदर
सर्वे क्र./ हिस्सा क्र. १०४
या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र
मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि.२०/०१/२०११ चा अर्ज.
२) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टी.ए/टे.नं.४/घोडबंदर/एस.आर-२२२, दि.२७/११/०७ ची मंजूरी.
३) वी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. ईआय/एनओसी/२७८/१०, दि.०८/१०/१० अन्वये नाहरकत दाखला.

## -: बांधकाम प्रारंभपत्र :- (नकाशे मंजूरीसह)
## (फक्त जोत्यापर्यंत) (भुखंड "अे" च्या मर्यादित)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - घोडबंदर सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. १०४ या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तींचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.
२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.